## (६) विषय - शास्त्र

शास्त्र अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी प्रश्नावलीला दिलेला प्रतिसाद खालील प्रमाणे -

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. १ हा पाठ टाचण न काढता मार्गदर्शन घेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यानी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२१३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२१३

पाठ टाचणाशिवाय मार्गदर्शन

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पाठटाचण काढण्यातील अडचणी विचारतो व त्यासंबंधी मार्गदर्शन करतो. | ५ | ४१.६७ |
| २) | मार्गदर्शन नाही, प्रथम कच्चे टाचण काढा | ६ | ५०.०० |
| ३) | टाचण नाही मग घटकाचा अभ्यास केला का हे पाहतो | १ | ०८.३३ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | अडचण विचारतात तीचे निरसण करतात संबंधित घटकावर चर्चा करून टाचण काढतात. | ३ + १ | २६.६७ |
| २) | मार्गदर्शन देत नाहीत. प्रथम टाचण हवे. | ४ + ३ | ४६.६६ |
| ३) | पाठटाचण कसे काढावे याचे मार्गदर्शन करतात | २ + २ | २६.६७ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

## निरीक्षण व अर्थविर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एखादा विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण न काढताच संबंधित पाठावर मार्गदर्शन घेण्यास आला तर प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत. प्रथम टाचण तयार करा असे सांगतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ५०.०० टक्के व ४६.६ टक्के प्रमाण आहे. हे प्रमाण जास्त (दोन्ही सारणीत) आहे.

२) पाठ टाचण काढयातील अडचणी विचारतात व ते कसे काढावे याचे मार्गदर्शन करतात. याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ४१.६७ टक्के व २६.६७ टक्के आहे.

३) टाचण नसेल तर घटकाचा अभ्यास केला आहे का ? हे पाहतात. प्राध्यापक सारणीमध्ये याचे ८.३३ टक्के प्रमाण आहे.

४) अडचण विचारुन संबंधित घटकावर चर्चा करतात व टाचण काढायला सांगतात. याचे विद्यार्थी सारणीमध्ये २६.६७ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

## निष्कर्ष :

विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण तयार न करताच मार्गदर्शनासाठी शास्त्र अध्यापन-पध्दतीच्या पाठ मार्गदर्शकाकडे गेल्यास बहुसंख्य प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत. प्रथम कच्चे टाचण काढण्यास सांगतात. काही

प्राध्यापक मात्र पाठ टाचण काढण्यातील अडचणी विचारुन त्यासंबंधी मार्गदर्शन करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २ हा पाठ टाचण त्रोटक काढून नेण्यासंबंधिचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२१४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२१४
त्रोटक टाचणासंबंधी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | अर्धे टाचण पूर्ण करायला सांगतात, ते तपासत नाहीत. | ४ | ३३.३५ |
| २) | अडचणी विचारुन त्याचे निराकरण करतो, ते मुद्दे पुन्हा लिहून टाचण पूर्ण करा. | ६ | ५०.०० |
| ३) | बेफिकीरी असेल तर टाचण काळजीपूर्वक काढण्यास सूचना देतो. | २ | १६.६५ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | टाचण पूर्ण सविस्तर काढा असे सांगतात, नंतर मार्गदर्शन देतात. | ४ + २ | ४०.०० |
| २) | अपूर्ण त्रोटक भागावर मार्गदर्शन देतात, भर घालून टाचण काढा. | ५ + ३ | ५३.३५ |
| ३) | टाचण कॅन्सल, दुसरे काढा. | ० + १ | ०६.६५ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक-प्राध्यापक पाठ टाचण फारसे सविस्तर न काढता त्रोटक मुद्देवजा काढलेले असेल तर विद्यार्थी-शिक्षकाला ते टाचण पूर्ण, सविस्तर काढून आणायला सांगतात. त्याशिवाय तपासत वा मार्गदर्शन देत नाहीत. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ३३.३५ टक्के व ४०.०० टक्के प्रमाण आहे.

२) अडचणा विचारून त्यांचे निरसन करतात, त्रोटक भागावर मार्गदर्शन व भर करून टाचण काढायला सांगतात. याचे प्राध्यापक, विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५०.०० टक्के व ५३.३५ टक्के प्रमाण असून ते दोन्हीत जास्त आहे तसेच ते समान आहे.

३) बेफिकीरी असेल तर टाचण काळजीपूर्वक काढण्यासंबंधी सूचना देतो. प्राध्यापक सारणीमध्ये याचे १६.६५ टक्के प्रमाण आहे.

४) हे टाचणी कॅन्सल, दुसरे काढा असे म्हणातात. विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये याचे प्रमाणे ६.६५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

पाठ टाचण सविस्तर न काढता विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनासाठी गेल्यास शास्त्राचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अडचणा विचारून त्रोटक भागावर मार्गदर्शन करून टाचण पूर्ण करायला सांगतात. काही प्राध्यापक मात्र टाचण पूर्ण केल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ३ हा पाठ टाचण पूर्ण करण्यापूर्वी मिळणाऱ्या सूचनेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी - शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२१५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२१५

पाठटाचण पूर्ण करण्यापूर्वी सूचना

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | आशय, पध्दती, शैक्षणिक साधने यांचा विचार करा व उद्दिष्टे कशी साध्य होतील हे पाहा. | ६ | ५०.०० |
| २) | टाचण काळजीपूर्वक काढा अशी सूचना देतो. | ३ | २५.०० |
| ३) | प्रत्येक पायरीचे महत्त्व लक्षात घ्या. | २ | १६.६५ |
| ४) | नमुना टाचण पाहा. | १ | ०८.३५ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | उद्दिष्टे सफल होण्यास आशय/मुद्दे, साधने, प्रश्न, कथन, फलकलेखन इ. कडे लक्ष द्या. | ६ + ३ | ६०.०० |
| २) | टाचणात अधिक भर हवी, इतर टाचणे पहा, पाठयांश व इतर संदर्भाची माहिती घ्या | २ + २ | २६.६५ |
| ३) | पाठटाचण ही आवश्यक बाब आहे. ते काळजीपूर्वक काढा | १ + १ | १३.३५ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपध्दतीचे पाठ मार्गदर्शक-प्राध्यापक टाचण पूर्ण करण्यापूर्वी टाचणात आशय, पद्धती, शैक्षणिक साधने यांचा तसेच प्रश्न, कथन, फलक लेखन यांचा विचार, उद्दिष्टे करा याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५०.०० टक्के व ६०.०० टक्के आहे.

२) टाचण काळजीपूर्वक काढा अशी सूचना देतात. याचे दोन्ही सारणीतील प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व १३.३५ टक्के आहे.

३) प्रत्येक पायरीचे महत्त्व लक्षात घ्या. प्राध्यापक सारणीमध्ये १६.६६ टक्के प्रमाण आहे.

४) टाचणात अधिक भर हवी. इतर टाचणे पहा. पाठ्यांश व इतर संदर्भांची माहिती घ्या. याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २६.६५ टक्के प्रमाण आहे.

५) नमुना टाचण पहा. प्राध्यापक सारणीत ८.३ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपध्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचण पूर्ण करण्यापूर्वी आशय पध्दती, शैक्षणिक साधने, प्रश्न, कथन, फलक लेखन याचा उद्दिष्ट साध्यतेच्या दृष्टीने विचार करण्यासंबंधी सूचना देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ४ हा पाठ मार्गदर्शनाची सुरुवात ज्या घटकापासून करतात त्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२१६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२१६
पाठमार्गदर्शनाचा सुरवातीचा घटक

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | उद्दिष्टे | ३ | २५.०० |
| २) | प्रस्तावना | १ | ०८.३५ |
| ३) | आशय/पाठ्यमुद्दे | ५ | ४१.६५ |
| ४) | पूर्वज्ञान | ३ | २५.०० |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | अध्यापन-पद्धती | १ + ० | ०६.६५ |
| २) | उद्दिष्टे | ० + २ | १३.३५ |
| ३) | प्रस्तावना | १ + २ | २०.०० |
| ४) | आशय/पाठ्यमुद्दे | ५ + १ | ४०.०० |
| ५) | पूर्वज्ञान | २ + १ | २०.०० |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपध्दतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक पाठ मार्गदर्शनास विद्यार्थी-शिक्षक आल्यास मार्गदर्शनाची सुरवात आशय / पाठ्य-मुद्दे यापासून करतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४१.६५ टक्के प्रमाण आहे व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के आहे.

२) पूर्वज्ञानापासून मार्गदर्शनास सुरवात करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २५.०० टक्के व २०.०० टक्के प्रमाण आहे.

३) प्रस्तावनोपासून सुरवात करतात. याचे प्रमाण अनुक्रमे ८.३५ टक्के व २०.०० टक्के आहे.

४) उद्दिष्टापासून सुरवात करतात. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व १३.३५ टक्के आहे.

५) अध्यापनपध्दती प्रथम पाहतात. विद्यार्थी सारणीमध्ये याचे ६.६५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र पाठ मार्गदर्शनास विद्यार्थी-शिक्षक प्राध्यापकाकडे गेल्यास ते प्रथम आशय / पाठ्य-मुद्दे यापासून सुरुवात करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५ हा मार्गदर्शनात चर्चा केल्या जाणा-या मुद्दयांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२१७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२१७

मार्गदर्शनाच्या घटकांचा क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेला घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी शिक्षकांनी दिलेला घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १) | पूर्वज्ञान | ११३ | १. | पूर्वज्ञान | १३२ |
| २) | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १०३ | २. | पाठय-मुद्दे | ११८ |
| ३) | आशय / पाठय-मुद्दे | १०० | ३. | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ११४ |
| ४) | प्रस्तावना | ८७ | ४. | शिक्षक, विद्यार्थी कृती | ८९ |
| ५) | शिक्षक, विद्यार्थी कृती | ७१ | ५. | संकलन | ६३ |
| ६) | शैक्षणिक साधने | ४९ | ६. | उपयोजन | ५७ |
| ७) | संकलन | ४६ | ७. | शैक्षणिक साधने | ५२ |
| ८) | फलक लेखन | ३९ | ८. | प्रेरणा | ४५ |
| ९) | मूल्यमापन साधने | ३६ | ९. | फलक लेखन | ४० |
| १०) | उपयोजन | ३० | १०. | मूल्यमापन साधने | ३३ |

निरीक्षण व अर्थविर्वचन :

वरील सारणीमध्ये प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले क्रम भिन्न आहेत. म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये ज्या क्रमाने

घटकांची चर्चा करतात त्या घटकांचा प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला क्रम एकत्रित केला असता खालील क्रम / निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपध्दतीचे मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये १) पूर्वज्ञान, २.५) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, २.५) आशय / पाठय मुद्दे, ४) शिक्षक-विद्यार्थी कृती, ५.५) प्रस्तावना, ५.५) संकलन, ७) शैक्षणिक साधने, ८) उपयोजन, ९) फलक लेखन, १०) मूल्यमापन साधने याप्रमाणे क्रम देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ६ हा पूर्वज्ञान चर्चेमधील मुद्दयांसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२१८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२१८
पूर्वज्ञानाच्या चर्चेमधील मुद्दे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | विद्यार्थ्यांनी पूर्वी अभ्यासलेले धडे, नवीन पाठयांशाशी सांगड. | ८ | ६६.६५ |
| २) | मागील पाठाची, विद्यार्थ्यांच्या वयोगटाची चर्चा. | ४ | ३३.३५ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | पूर्वज्ञान घटकाशी सुसंगत आहे का ? | ४ + २ | ४०.०० |
| २) | घटक व प्रेरणा यांची सांगड पाहतात. | २ + १ | २०.०० |
| ३) | विद्यार्थी-शिक्षकाचे पूर्वज्ञान आजमावतात. | ३ + ३ | ४०.०० |
| | | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक-प्राध्यापक पूर्वज्ञानावर चर्चा करताना पाठयांश कोणता आहे, त्याची पूर्वज्ञानाशी सांगड बसते का ? याचे प्राध्यापक, विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ६६.६५ टक्के व ४०.०० टक्के प्रमाण आहे.

२) मागील पाठाचा, विद्यार्थ्यांच्या वयोगटाचा विचार करतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३३.३५ टक्के प्रमाण आहे.

३) प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचे पूर्वज्ञान आजमावतात त्याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीत ४०.०० टक्के प्रमाण आहे.

४) पूर्वज्ञानाची घटक व प्रेरणा यांच्याशी सांगड पाहतात. विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये त्याचे प्रमाण २०.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानावर चर्चा करताना पाठयांश व पूर्वज्ञान यांची सुसंगती या बाबींकडे लक्ष देतात. काही प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचे पूर्वज्ञान आजमावतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ७ हा पूर्वज्ञानासंदर्भातील प्रश्न विचारण्या-संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२१९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२१९

पूर्वज्ञानासंदर्भात प्रश्न विचारणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पूर्वज्ञान नवीन घटकाशी प्रेरणेशी जोडता येईल का ? | २ | १६.६६ |
| २) | पूर्वीच्या इयत्तेत कोणते ज्ञान होते ? पाठाचे नाव सांगा. त्याचा कोठे संबंध जोडणार ? | ८ | ६६.६८ |
| ३) | हेच पूर्वज्ञान का गृहीत धरले ? | २ | १६.६६ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | विद्यार्थ्यांचा दैनंदिन अनुभव कोणता ? त्यांना दैनंदिन अनुभवाद्वारे पाठाकडे कसे नेणार ? | १ + ० | ०६.६६ |
| २) | कोणत्या इयत्तेत हा भाग ती शिकली ? पाठ कोणता ? | ४ + ३ | ४६.६६ |
| ३) | हेच पूर्वज्ञान योग्य कसे ? प्रश्नाने अपेक्षित उत्तर मिळेल कां ? कसे ? | १ + ३ | २६.६६ |
| ४) | प्रश्न विचारत नाहीत. | ३ + ० | २०.०० |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंदर्भात विद्यार्थी-शिक्षकाला विचारत असलेल्या प्रश्नांमध्ये विद्यार्थ्याला पूर्वीच्या इयत्तेत कोणते ज्ञान / पाठ झालेला आहे ? पाठाचे नाव सांगा ? त्याचा या घटकात कोठे संबंध जोडणार ? याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ६६.६८ टक्के व ४६.६६ टक्के प्रमाण आहे. ते दोन्ही सारणीत अधिक आहे.

२) हेच पूर्वज्ञान का गृहीत धरले ? यावरुन विचारलेल्या प्रश्नाला अपेक्षित उत्तर मिळेल का ? याचे प्रमाण अनुक्रमे १६.६६ टक्के व २६.६६ टक्के आहे.

३) पूर्वज्ञान नवीन ज्ञान घटकाशी / प्रेरणेशी जोडता येईल का ? कसे ? याचे प्राध्यापक सारणीमध्ये १६.६६ टक्के प्रमाण आहे.

४) प्रश्न विचारत नाहीत.याचे विद्यार्थी सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

५) विद्यार्थ्यांचा दैनंदिन अनुभव कोणता ? त्यांना दैनंदिन अनुभवाद्वारे पाठाकडे कसे नेणार ? याचे विद्यार्थी सारणीमध्ये ६.६६ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंबंधी चर्चा करताना पूर्वीची इयत्ता, पाठ, त्यातील ज्ञान व घटकांतील संबंध या बाबींवर प्रश्न विचारतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ८ हा विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता न येण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२२० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२२०

पूर्वज्ञानासंबंधी मागील संदर्भ न येणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | संदर्भ शोधा, पाठाचे पुन्हा वाचन करा. | २ | १६.६५ |
| २) | उदाहरणे देऊन मार्गदर्शन करतात, पूरक प्रश्न विचारुन योग्य संदर्भ आठवणीत आणून देतो. | ७ | ५८.३५ |
| ३) | स्वत: तो संदर्भ सांगतो. | ३ | २५.०० |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | मागील पाठ्यपुस्तक किंवा पाठ्य-घटक वाचायला सांगतात. | ३ + १ | २६.६५ |
| २) | प्रश्न, उदाहरणे देऊन चर्चा करतात. चालू घडामोडीवर चर्चा करतात. | ३ + ३ | ४०.०० |
| ३) | स्वत: संदर्भ सांगतात. | ३ + २ | ३३.३५ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

## निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक-प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल मागील इयत्तांचा संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता येत नसल्यास उदाहरणे देऊन मार्गदर्शन करतात, पूरक प्रश्न, योग्य संदर्भ आठवणीत आणून देतात, चालू घडामोडी-वर चर्चा करतात. याचे प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५८.३५ टक्के व ४०.०० टक्के प्रमाण आहे.

२) प्राध्यापक स्वत: तो संदर्भ सांगतात. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ३३.३५ टक्के आहे.

३) मागील पाठ्यपुस्तक, संदर्भ शोधा / वाचा तसेच पाठ्य-घटकाचे वाचन करायला सांगतात. याचे प्रमाण अनुक्रमे १६.६५ व ३३.३५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

## निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंबंधी मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता येत नसल्यास उदाहरणे, पूरक प्रश्न, योग्य संदर्भ, चालू घडामोडीवर चर्चा यातून आठवणीत आणून देतात. काही प्राध्यापक तो संदर्भ स्वत: सांगतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ९ हा विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२२१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२२१

विद्यार्थी शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | विविध उदाहरणे देतो व निवडा असे सांगतो. | ४ | ३३.३३ |
| २) | नवीन घटकात जे शिकवायचे ते वाचा, चर्चा करा, सुचेल. | २ | १६.६७ |
| ३) | प्रश्न विचारून चालना, क्ल्यू देतो. | ६ | ५०.०० |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | घटक परत वाचायला सांगतात चित्रे, दैनंदिन अनुभव वापरा असे ... | २ + ३ | ३३.३५ |
| २) | स्वत: प्रेरणा सुचवितात, करून दाखवितात. | १ + ० | ०६.६५ |
| ३) | पाठपुरावा प्रश्न विचारून मार्गदर्शन करतात, त्यातून प्रेरणा देण्यास उद्युक्त करतात. | ६ + ३ | ६०.०० |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला योग्य प्रेरणा सुचत नसल्यास विविध उदाहरणे देतात. त्यातील योग्य ते निवडायला सांगतात. प्राध्यापक सारणीमध्ये ३३.३३ टक्के प्रमाण आहे.

२) प्रश्न विचारुन कल्पु, चालना देतात. याचे प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५०.०० टक्के व ६०.०० टक्के प्रमाण आहे.

३) घटक परत वाचायला सांगतात, चर्चा करा सुचेल असे सांगतात याचे प्रमाण अनुक्रमे १६.६७ व ३३.३५ टक्के आहे.

४) स्वत: प्रेरणा सुचवितात / करुन देतात. याचे विद्यार्थी सारणी-मध्ये ६.६५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षका-ला प्रेरणा सुचत नसल्यास प्रश्न विचारुन विचाराला चालना देतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १० हा प्रेरणेसंबंधातील मार्गदर्शनात प्राध्यापक ज्या बाबींचा विचार करतात त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र. ४.२२२ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.२२२

प्रेरणेमधील घटक क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १) | घटकाला अनुरूपता | २६ | १. | प्रेरणा देणाऱ्या कृती | ५२ |
| २) | प्रेरणा देणाऱ्या कृती | १८ | २. | घटकाला अनुरूपता | ४५ |
| ३) | प्रेरणेची हेतुकथनाशी सांगड | १७ | ३. | प्रेरणेची हेतुकथनाशी घातलेली सांगड | ३२ |
| ४) | प्रस्तावनेचा परिणाम | ९ | ४. | प्रस्तावनेचा परिणाम | २० |

वरील सारणीमध्ये प्रेरणेतील घटक क्र. ३, ४ यात समान क्रम आहे. पण क्र. १ व २ भिन्न आहेत. म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देत असता प्रेरणेमधील घटकाला जो क्रम देतात त्या घटकांचा प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेला क्रम एकत्रित करता पुढील निष्कर्ष येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापन-पद्धती पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देताना १.५) घटकाला अनुरूपता, १.५) प्रेरणा देणाऱ्या कृती, ३) प्रेरणेची हेतुकथनाशी घातलेली सांगड, ४) प्रेरणेचा परिणाम याप्रमाणे क्रम देतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ११ हा पाठ टाचणामध्ये मुद्दे, उपमुद्दे नसल्या-संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२२३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२२३

पाठ टाचणामध्ये मुद्दे, उपमुद्दे नसणे

| अ.नं. | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पाठ्यांश वाचा, मुद्दे, उपमुद्दे टाचणामध्ये लिहा व मार्गदर्शन घ्या. | ९ | ७५.०० |
| २) | ते कसे काढावेत, कोणते मुद्दे निघतील यावर मार्गदर्शन देतात. | ३ | २५.०० |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | स्वत: मुद्दे तयार करून देतात, टाचणात लिहितात व टाचण परत लिहा.. | २ + ० | १३.३३ |
| २) | मार्गदर्शन करून लिहायला सांगतात. | ४ + १ | ३३.३३ |
| ३) | तपासत नाहीत. मुद्दे, उपमुद्दे लिहून आणा.. | ३ + ५ | ५३.३४ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक टाचणामध्ये अध्यापन मुद्दे उपमुद्दे नसल्यास पाठ्यांश वाचा, मुद्दे, उपमुद्दे लिहा व मग मार्गदर्शन घ्या असे सांगतात, त्यासत नाहीत. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ७५.०० टक्के व विद्यार्थी शिक्षण सारणीमध्ये ५३.३४ टक्के प्रमाण आहे.

२) ते कसे काढावेत, कोणते मुद्दे, उपमुद्दे निघतील यावर चर्चा करतात व टाचणात लिहायला सांगतात. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ३३.३३ टक्के आहे.

३) स्वत: प्राध्यापक मुद्दे तयार करून देतात. टाचणात लिहितात-याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १३.३ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचणामध्ये मुद्दे, उपमुद्दे नसल्यास ते लिहायला सांगतात, नंतर मार्गदर्शन देतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १३ हा प्रत्येक मुद्दयावरील चर्चेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२२४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२२४

प्रत्येक मुद्दयावरील चर्चा

| | होय | नाही | आवश्यक वाटल्यास | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | - | २ | १२ |
| विद्यार्थी-शिक्षक | ९३.३५ | १ | १६.६५ | १०० |
| एकूण .. | ८६.९५ | १३.३५ | | १००. |

## निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रत्येक अध्यापन मुद्दयावर चर्चा करतात. याचे प्राध्यापक, विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ९३.३५ टक्के व ८६.६५ टक्के प्रमाण आहे. ते जास्त आहे.

२) आवश्यक वाटल्यास प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये १६.६५ टक्के प्रमाण आहे.

३) प्रत्येक मुद्दयावर चर्चा करत नाहीत याचे विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये १३.३५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढतात.

## निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अध्यापन मुद्दयावरील चर्चेत प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १४ हा पाठ्य-मुद्द्यावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२२५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२२५
मुद्द्यावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देणे

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | ९ | ३ | १२ |
| | ७५.०० | २५.०० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपध्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन देतात. याचे प्रमाण ७५.०० टक्के आहे व ते जास्त आहे.

२) अवांतर वाचन देत नाहीत. याचे प्रमाण २५.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकालाअवांतर वाचन देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. १५ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. १४ हा पाठ्य-मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारण्या-संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२२६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२२६

पाठ्यमुद्दयांचे स्पष्टीकरण विचारणे

| | होय | नाही | कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | - | २ | १२ |
| | ९३.३५ | | १६.६५ | १०० |
| विद्यार्थी शिक्षक | १२ ८ | १ | २ | १५ |
| एकूण .. | ८०. | ६.६५ | १३.३५ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ्य मुद्दयावर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ९३.३५ टक्के व ८०.०० टक्के आहे.

२) मुद्दयांचे स्पष्टीकरण कधी कधी विचारतात याचे प्रमाण अनुक्रमे १६.६५ टक्के व १३.३५ टक्के आहे.

३) मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारत नाहीत याचे विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये ६.६५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

यावरून शास्त्र अध्यापनपध्दतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक पाठ्य-मुद्दयांवर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. १६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. १५ हा मुद्दयांचे स्पष्टीकरण विद्यार्थी-शिक्षकाला न येण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२२७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२२७

विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण न आल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन देतो. | ३ | २५ |
| २) | स्वत: त्या मुद्दयांचे स्पष्टीकरण करतो. | ३ | २५ |
| ३) | काळजीपूर्वक अभ्यास करण्याची जाणीव देतो व तो घटक परत वाचून, समजून घ्या असे सांगतो. | ६ | ५० |
| | एकूण .. | १२ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | स्पष्टीकरण कसे करावे ते सांगतात. | ३ + ० | २० |
| २) | प्रश्न, चर्चा करून स्पष्टीकरणास प्रवृत्त करतात. | ३ + ० | २० |
| ३) | स्वत: त्या मुद्दयांचे स्पष्टीकरण करून सांगतात. | १ + २ | २० |
| ४) | अधिक वाचन करा, अभ्यास नाही मग टाचण कसे लिहिले. पुन्हा वाचा. | २ + ४ | ४० |
| | एकूण .. | ९ + ६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण देता आले नाही तर काळजीपूर्वक अभ्यास करण्याची जाणीव देतात व तो घटक परत वाचून, समजून घेऊन टाचण लिहायला सांगतात. याचे प्राध्यापक, विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ५०.०० टक्के व ४०.०० टक्के प्रमाण आहे.

२) स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन करतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये २५.०० टक्के प्रमाण तर विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २०.९० टक्के प्रमाण आहे.

३) प्राध्यापक स्वत: त्या मुद्दयाचे स्पष्टीकरण करतात. याचे प्रमाण अनुक्रमे १६.६५ टक्के व २०.०० टक्के प्रमाण आहे.

४) प्रश्न, चर्चा करून स्पष्टीकरणास प्रवृत्त करतात. याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयाचे स्पष्टीकरण आले नाही तर काळजीपूर्वक अभ्यास करण्याची जाणीव देऊन तो घटक परत वाचून येण्यास सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. १७ हा विद्यार्थी टाचण व्यवस्थित लिहितो पण मार्गदर्शनाच्यावेळी स्पष्टीकरण न येण्यासंबंधीचा आहे व त्यावर विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्र. १६ हा प्राध्यापक स्पष्टीकरण न

आल्यास सविस्तर आशय सांगण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती अनुक्रमे सारणी क्र. ४.२२८ व ४.२२९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२२८

टाचण व्यवस्थित पण मार्गदर्शनाच्यावेळी स्पष्टीकरण न येणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | स्पष्टीकरणाविषयी संदर्भ देतो, चर्चा करून स्पष्टीकरण कसे करावे सांगतो. | ८ | ६६.६७ |
| २) | पाठटाचण त्यानेच काढले का ? याची खात्री करून घेतो. | ४ | ३३.३३ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |

सारणी क्र.४.२२९

पाठ्यांश सविस्तर सांगणे विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद

| | होय | नाही | कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| | ८ | १ | - | ९ |
| | ४ | - | २ | ६ |
| एकूण .. | ८०.०० | ६.६५ | १३.३५ | १००.०० |

## निरीक्षण व अर्थ विर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण व्यवस्थित लिहितो, पण मार्गदर्शनाच्यावेळी प्रश्न विचारल्यास स्पष्टीकरण देऊ शकत नाही अशावेळी -

अ) स्पष्टीकरणाविषयी संदर्भ देतात, चर्चा करून स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन देतात. याचे ६६.६७ टक्के इतके प्रमाण आहे.

ब) त्यानेच टाचण काढलेय का ? खात्री करून घेतात. याचे ३३.३३ टक्के प्रमाण आहे.

२) विद्यार्थी सारणीमध्ये स्पष्टीकरण आले नाही तर पाठ्यांश सविस्तर सांगतात. याचे प्रमाण ८०.०० टक्के आहे.

३) पाठ्यांश सविस्तर सांगत नाहीत याचे ६.६५ टक्के प्रमाण आहे.

४) कधी कधी पाठ्यांश सविस्तर सांगतात याचे प्रमाण १३.३५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

## निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एखादा विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण व्यवस्थित लिहितो, पण मार्गदर्शनाच्यावेळी त्याला स्पष्टीकरण आले नाही तर बहुसंख्य प्राध्यापक प्रश्न चर्चेतून स्पष्टीकरण कसे करावे यासंबंधी संदर्भ देतात. प्राध्यापक पाठ्यांश सविस्तर सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. १८ हा घटकाशी निगडित आशय सांगण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२३० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२३०

घटकाशी निगडित आशय सांगणे

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | ३ | ९ | १२ |
| | २५.०० | ७५.०० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत.याचे प्रमाण ७५.०० टक्के आहे.

२) घटकाशी निगडित आशय सांगतात.याचे प्रमाण २५.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. १९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. १७ हा उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यावरील मार्गदर्शनातील बाबीसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२३१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२३१

उद्दिष्टे व स्पष्टीकरणामधील बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | नेमकी व योग्य लिहिलीत का ? | ३ | २५.०० |
| २) | घटकानुरूप आहेत का ? | ५ | ४१.६५ |
| ३) | उद्दिष्टे क्रमानुसार आहेत का ? ज्ञान, आकलन, उपयोजन इ. | ४ | ३३.३५ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | उद्दिष्टांचा मूल्यमापन प्रश्नांशी संबंध | १ + १ | १३.३३ |
| २) | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे योग्य, नेमकी लिहिली आहेत ? एकवचनी, वर्तमानकाळी विधान इ. | ३ + ३ | ४०.०० |
| ३) | पाठ्यघटकाला साजेशी, ३५ मिनिटात साध्य होणारी · | ५ + ० | ३३.३४ |
| ४) | उद्दिष्टांचा क्रम व संकलन उपयोजन . | ० + २ | १३.३३ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणाचे मार्गदर्शन देताना ती घटकानुरूप आहेत का ? ३५ मिनिटात साध्य होणारी आहेत का ? याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४१.६५ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ३३.३४ टक्के प्रमाण आहे.

२) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे योग्य, नेमकी लिहिली आहेत का ? उदा. एकवचनी, वर्तमानकाळी, विधान इ. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ४०.०० टक्के आहे.

३) उद्दिष्टे क्रमानुसार आहेत का ? ज्ञान-आकलन, उपयोजन इ. तसेच संकलन, उपयोजन पाहतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ३३.३५ टक्के व १३.३३ टक्के प्रमाण आहे.

४) उद्दिष्टांचा मूल्यमापन प्रश्नांशी संबंध पाहतात. याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १३.३३ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक उद्दिष्टये व स्पष्टीकरणे यांचे मार्गदर्शन देताना त्यांची घटकानुरूपता, ३५ मिनिटात साध्य होणारी या बाबी पाहतात. काही प्राध्यापक उद्दिष्टे नेमकी, योग्य लिहिणे एकवचनी, वर्तमानकाळी, विधानस्वरूप इ. बाबी पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २० हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. १८ हा पाठ्य घटकाला अधिक उद्दिष्टांच्या गरजेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२३२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२३२

पाठ्य घटकानुसार अधिक उद्दिष्टांच्या गरजेसंबंधी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | अधिक उद्दिष्टे कोणती ती स्वत: सांगतो. | ३ | २५.०० |
| २) | अधिक कशी लिहिता येतील यावर चर्चा करून निदर्शनास आणतो. | ४ | ३३.४० |
| ३) | अधिक उद्दिष्टे लिहायला सांगतो. सूचना देतो. | ५ | ४१.६० |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | अधिक उद्दिष्टे प्राध्यापक स्वत: टाकणात नमूद करतात. | २ + १ | २०.०० |
| २) | चर्चेतून, मार्गदर्शनातून लक्षात आणून देतात, सुचवितात. | ४ + २ | ४०.०० |
| ३) | अधिक उद्दिष्टे लिहा अशी सूचना देतात. | ३ + ३ | ४०.०० |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ्य घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असेल तर ती लिहायला सांगतात, तशी सूचना देतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४१.६५ टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

२) चर्चेतून मार्गदर्शनातून अधिक उद्दिष्टे निदर्शनास आणतात. याचे प्रमाण अनुक्रमे ३३.४० टक्के व ४०.०० टक्के आहे.

३) अधिक उद्दिष्टे प्राध्यापक स्वतः सांगतात. याचे दोन्हीमध्ये प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व २०.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> :

शास्त्र अध्यापन-पद्धतीचे बहुसंख्य पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठय - घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास ती उद्दिष्टे लिहिण्याची सूचना देतात. काही प्राध्यापक मात्र ती चर्चेतून निदर्शनास आणतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २१ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली-मधील प्रश्न क्र.१९ हा विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलण्या-मागील कारणे सांगण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२३३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२३३

उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदला मागील कारण सांगणे

| | होय | नाही | कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ११ | १ | - | १२ |
| | ९१.६५ | ८.३५ | | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | १५ | - | - | १५ |
| एकूण .. | १००.०० | | | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांची उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलत असता त्या मागील कारणे सांगतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ९१.६५ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये १००.०० टक्के प्रमाण आहे.

२) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलामागील कारणे सांगता नाहीत. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ८.३५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टे व स्पष्टीकरणामध्ये बदल करत असताना त्यामागील कारण सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २२,२३,२४ हे व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २०, २१, २२ हे शैक्षणिक साधने घटकानुसार समाविष्ट न केल्यास ती दाखविणे, त्यांच्या कल्पना सुचविणे व उपलब्धतेविषयी माहिती देण्यासंबंधीचे आहेत. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२३४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२३४

शैक्षणिक साधनांसंबंधी

| | | होय | नाही | कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| शैक्षणिक साधने | प्राध्यापक | ११ | १ | - | १२ |
| दाखविण्यास सांगतात. | | ९१.६५ | ८.३५ | | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षक | १५ | - | - | १५ |
| | एकूण .. | १००.०० | - | - | १००.०० |
| साधनांच्या कल्पना | प्राध्यापक | १२ | - | - | १२ |
| सुचवितात. | | १००.०० | | | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षक | १५ | - | - | १५ |
| | एकूण .. | १००.०० | - | - | १००.०० |
| उपलब्धतेविषयी | प्राध्यापक | १२ | - | - | १२ |
| माहिती सांगतात. | | १००.०० | | | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षक | १५ | - | - | १५ |
| | एकूण .. | १००.०० | - | - | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने पाठ्य-विषयाला अनुसरुन शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसल्यास -

अ) ती दाखविण्यास सांगतात.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ९१.६५ व १००.०० टक्के प्रमाण आहे.

ब) दाखविण्यास सांगत नाहीत.याचे प्रमाण अनुक्रमे ८.३५ व ०.०० टक्के आहे.

२) शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवितात.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे १००.०० टक्के आहे.

३) शैक्षणिक साधनांच्या उपलब्धेविषयी माहिती सांगतात.याचे प्रमाण दोन्ही सारणीमध्ये १००.०० टक्के आहे.

यावरून शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने पाठ्य विषयाला अनुसरून शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसल्यास -

अ) विद्यार्थी-शिक्षकांना ती दाखविण्यास सांगतात.
ब) साधनांच्या उपलब्धेविषयी माहिती सांगतात.
क) त्यांना कल्पना सुचवितात.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

**निष्कर्ष :**

शास्त्र अध्यापनपद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने पाठ्यविषयाला अनुसरून शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसेल तर ती दाखविण्यास सांगतात, त्यांच्या कल्पना सुचवितात तसेच त्यांच्या उपलब्धतेविषयी माहिती देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २५ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २३ हा शिक्षक कृतीवरील चर्चेतील बाबीसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२३५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२३५

शिक्षककृतीमधील चर्चेच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पाठ्यघटकानुसार कृतीक्रम - प्रश्न शैक्षणिक साधने यांचे नियोजन. | ५ | ४१.६५ |
| २) | प्रश्न, प्रयोग, दिग्दर्शन यात सुसंगती. | ४ | ३३.३५ |
| ३) | फलक लेखन आकृती यांची योग्य तिथे नोंद. | ३ | २५.०० |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | पाठ्यक्रमानुसार कृतीक्रम-प्रश्न, शैक्षणिक साधने यांचे नियोजन आहे का ? | ३ + ३ | ४०.०० |
| २) | प्रश्न, प्रयोग दिग्दर्शन, स्पष्टीकरण यात सुसंगती आहे का ? | ३ + २ | ३३.३५ |
| ३) | फलक लेखन, आकृती यांची योग्य तिथे नोंद, प्रेरणा ते स्वाध्यायासेर | ३ + १ | २६.६५ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरून शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक शिक्षककृतीची चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने नियोजनात लिहिलेल्या शिक्षक कृतीपैकी तीचा पाठ्यक्रमानुसार कृतिक्रम प्रश्न, शैक्षणिक साधने यांचे नियोजन आहे का ? हे पाहतात. याचे प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक सारणी-मध्ये ४१.६५ टक्के व ४०.०० टक्के प्रमाण आहे व ते अधिक, समान आहे.

२) प्रश्न, प्रयोग, दिग्दर्शन, स्पष्टीकरण यात सुसंगती आहे का ? याचे प्रमाण दोन्ही सारणीत ३३.३५ टक्के आहे.

३) फलक लेखन, आकृती यांची योग्य तिथे नोंद म्हणाचे प्रेरणा ते स्वाध्या-याखेर कृतीची नोंद आहे का ? याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व २६.६५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक शिक्षककृतीवर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने नियोजनात लिहिलेल्या शिक्षककृतीपैकी पाठ्य-क्रमानुसार कृतिक्रम, प्रश्न, शैक्षणिक साधने यांच्या नियोजनावर चर्चा करतात. काही प्राध्यापक प्रश्न, प्रयोग दिग्दर्शन, स्पष्टीकरण यांच्या सुसंगतीवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २५ हा शिक्षककृतीवरील चर्चेत अवांतर माहिती देण्या-संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२३६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२३६

शिक्षककृतीवरील चर्चेत अवांतर माहिती देणे

| | होय | नाही | कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ९ | ३ | - | १२ |
| | ७५.०० | २५.०० | | १०० |
| विद्यार्थी शिक्षक | ८ | ५ | २ | १५ |
| एकूण .. | ५३.३४ | ३३.३३ | १३.३३ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षककृतीवर चर्चा करताना अवांतर माहिती देतात.याचे प्राध्यापक, विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ७५.०० टक्के व ५३.३४ टक्के आहे.

२) अवांतर माहिती देत नाहीत.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ३३.३३ टक्के आहे.

३) कधी कधी अवांतर माहिती देतात.याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १३.३३ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक शिक्षककृतीवरील चर्चेत विद्यार्थी_शिक्षकाला अवांतर माहिती देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २७ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २४ हा प्राध्यापक शिक्षककृतीमधील मार्गदर्शनात ज्या बाबींना अधिक महत्त्व देतात त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र. ४.२३७ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.२३७

शिक्षककृतीमधील घटकांचा महत्त्वानुसार क्रम

| अनु. | प्राध्यापक घटकाला दिलेला क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी शिक्षक घटकाला दिलेला क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १) | विद्यार्थी सहभाग | २८ | १) | विद्यार्थी सहभाग | ४१ |
| २) | प्रश्न | २५ | २) | शैक्षणिक साधन | ४० |
| ३) | कथन / स्पष्टीकरण | २५ | ३) | प्रश्न | ३७ |
| ४) | शैक्षणिक साधन | २२ | ४) | कथन / स्पष्टीकरण | ३२ |
| | अन्य: फलक लेखन, निरीक्षण, दिग्दर्शन | | | | |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरील सारणीमध्ये प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेल्या क्रमात क्र.१ शिवाय भिन्नता आहे. म्हणून प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी शिक्षक कृतीमधील घटकांना दिलेले क्रम एकत्रित केले असता पुढील निष्कर्ष काढता येईल.

**निष्कर्ष :**

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक शिक्षककृतीमधील घटकांना महत्त्वानुसार पुढील क्रम देतात - १) विद्यार्थी सहभाग, २) प्रश्न, ३) शैक्षणिक साधन, ४) कथन किंवा स्पष्टीकरण.

वरील घटकांशिवाय प्राध्यापकांनी सुचविलेले घटक - फलक लेखन, निरीक्षण, दिग्दर्शन.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २८ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २६ हा विद्यार्थी कृतीवरील मार्गदर्शनातील बाबी-संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२३८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२३८

विद्यार्थीकृतीमधील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | विद्यार्थ्यांच्या कृतींचा बोध केला आहे का ? उत्तरे देतात, निरीक्षण करतात इ. | ४ | ३३.३३ |
| २) | कृतीयुक्त, शाब्दिक सहभाग कसा, कोठे मिळविता येईल याची चर्चा लिहून घेणे, निरीक्षण करणे, निष्कर्ष काढणे. | ३ | २५.०० |
| ३) | विद्यार्थ्यांकडून योग्य उत्तर, सर्वांना प्रश्न विचारून अधिक सहभाग घेणे. | ४ | ३३.३३ |
| ४) | वयोगटानुसार भाषेचा वापर, वर्ग नियंत्रण इ. | १ | ०८.३४ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |

| विद्यार्थी - शिक्षकाचा प्रतिसाद | | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | वयोगटानुसार भाषा, प्रश्न, सोप्या भाषेत विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद यावा. | १ + १ | १३.३३ |
| २) | पाठाच्यावेळी विद्यार्थी ज्या कृती करणार त्या लिहिल्यात का ? | ३ + ३ | ४०.०० |
| ३) | पाठयचणात विद्यार्थी सहभाग कसा, कोठे घ्यावा याचे मार्गदर्शन, कृतीयुक्त,शाब्दिक. | ३ + २ | ३३.३४ |
| ४) | शैक्षणिक साधन, प्रश्न यातून सहभाग अधिक घ्यावा, लिहून घेण्यास वेळ देणे | २ + ० | १३.३३ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापन-पध्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी कृती संबंधी चर्चा करताना विद्यार्थी शिक्षकांनी - पाठ टाचणात विद्यार्थ्यांच्या कृतीचा बोध केला आहे का ? उदा. उत्तरे देतात, निरीक्षण करतात इ. याचे प्राध्यापक सारणी व विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये ३३.३३ टक्के व ४०.०० टक्के प्रमाण आहे.

२) विद्यार्थ्यांकडून योग्य उत्तर, सर्वांना प्रश्न विचारून अधिक सहभाग घ्यावा यावर चर्चा करतात. याचे प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व १३.३३ टक्के आहे.

३) कृतीयुक्त, शाब्दिक सहभाग कसा, कोठे कोठे मिळविता येईल यावर चर्चा करतात. उदा. लिहून घेतात, निरीक्षण करणे,निष्कर्ष काढणे इ. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ३३.३४ टक्के आहे.

४) वयोगटानुसार प्रश्न, भाषा, प्रश्न सोपा, विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद यावा याची चर्चा. याचे प्रमाण अनुक्रमे ८.३४ टक्के व १३.३३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थीकृती-संबंधी चर्चा करताना विद्यार्थी कृतींचा बोध करण्यासंबंधी चर्चा करतात. काही प्राध्यापक मात्र योग्य उत्तर सर्वांचा सहभाग (कृतियुक्त शाब्दिक) व त्यांची ठिकाणे या बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. २७ हा मूल्यमापनातील प्रश्नासंदर्भात चर्चा केल्या जाणाऱ्या गोष्टीसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२३९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२३९

मूल्यमापन प्रश्नांतील चर्चेच्या बाबी

| प्राध्यापकांचा प्रतिसाद | | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | सर्व मुद्दयांचा समावेश आहे का ? उपयोजनावर भर आहे का ? | ४ | ३३.३३ |
| २) | प्रश्न उद्दिष्टाधिष्ठित आहेत का ? प्रश्नातून उद्दिष्टे साध्य होते कां ? | ५ | ४१.६७ |
| ३) | प्रश्न प्रकारांवर चर्चा-स्वरूप, रचना इ. | २ | १६.६७ |
| ४) | उद्दिष्टे व घटक यानुसार प्रश्न | १ | ०८.३३ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | उद्दिष्ट-स्पष्टीकरणानुसार प्रश्न आहेत ? | ० + ३ | २०.०० |
| २) | प्रश्न उद्दिष्टानुसार, पातळीनुसार लघुत्तरी, वस्तुनिष्ठ, दीर्घोत्तरी इ. | ५ + ० | ३३.३५ |
| ३) | आशय त्यावरील उद्दिष्टे व त्यानुसार प्रश्न आहेत.? बौध्दिक स्तरानुसार. | ० + १ | ०६.६५ |
| ४) | प्रश्न प्रकार - सोपे, कठीण, उच्च निम्न, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी इ. | ४ + २ | ४०.०० |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

<u>निरीक्षण व अर्थनिर्वचन :</u>

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपध्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नासंदर्भात ज्या बाबींची चर्चा करतात त्यात - प्रश्न उद्दिष्टाधिष्ठित आहेत का ? प्रश्नांतून उद्दिष्ट साध्य होते का ? हे पाहतात.

याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ४१.६७ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ३३.३५ टक्के आहे.

२) सर्व मुद्दयांचा समावेश आहे का ? उपयोजनावर भर आहे का ? याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३३.३३ टक्के प्रमाण व विद्यार्थी सारणीत ६.६५ टक्के आहे.

३) प्रश्न प्रकार - कठीण, सोपे, उच्च, निम्न, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी इ. प्रश्न प्रकार पाहतात. याचे प्राध्यापक सारणीत १६.६७ टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

४) उद्दिष्ट स्पष्टीकरणानुसार प्रश्न आहेत का ? याचे विद्यार्थी - सारणीत २०.०० टक्के प्रमाण आहे.

५) उद्दिष्टे व घटक यानुसार प्रश्न याचे ८.३३ टक्के प्रमाण आहे. (प्राध्यापक सारणी)

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नासंदर्भात चर्चा करताना बहुसंख्य प्राध्यापक प्रश्न उद्दिष्टाधिष्ठित असण्यासंबंधी चर्चा करतात. काही प्राध्यापक सर्व मुद्दे, उपयोजन व प्रश्न प्रकार - उच्च - निम्न स्तरीय, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी इ. बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ३० हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २८ हा मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरूप सांगण्याविषयीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती

सारणी क्र. ४.२४० मध्ये दिलेली आहे.

## सारणी क्र.४.२४०

### मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरूप सांगणे

| | होय | नाही | फक्त सुरुवातीला सांगतो | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ६ | ३ | ३ | १२ |
| | ५०.०० | २५.०० | २५.०० | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | ९ | | - | १५ |
| | 2 | ४ | | |
| एकूण .. | ७३.३५ | २६.६५ | | १००.०० |

## निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्रअध्यापन पद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरूप सांगतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५०.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ७३.३५ टक्के प्रमाण आहे.

२) मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरूप सांगत नाहीत. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व २६.६५ टक्के आहे.

३) फक्त सुरवातीला मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरूप सांगतात. याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २५.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनात मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरूप सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३१ हा विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २९ हा स्वाध्यायावर चर्चा केल्या जाणाऱ्या बाबींसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२४१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२४१

स्वाध्यायावरील मार्गदर्शनातील बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | वयोगटाला पेलेल असा. | २ | १६.६५ |
| २) | स्वाध्याय पाठ्यघटकाचे दृढीकरण करणारा (घटकानुसार) आहे का ? | ५ | ४१.६५ |
| ३) | सर्जनशीलता, कल्पकता व निरीक्षण यांना वाव देणारा. | १ | ०८.३५ |
| ४) | विषयाची गोडी वाढविणारा, क्रियाशील परिसराशी संबंध जोडणारा. | ४ | ३३.३५ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | स्वाध्याय पाठ्यांशावर व त्याचे दृढीकरण करणारा आहे का ? | ६ + ४ | ६६.६५ |
| २) | चौकस बुद्धीला, कृतीला प्राधान्य देणारा | २ + ० | १३.३५ |
| ३) | आराखडा, शैक्षणिक साधन, कृतीपर असे मनोरंजक गोडी वाटणारा. | ० + २ | १३.३५ |
| ४) | चर्चा करत नाहीत. | १ + ० | ०६.६५ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना ते स्वाध्याय पाठ्यघटकानुसार पाठ्य घटकाचे दृढीकरण करणारा आहे का ? हे पाहतात. याचे प्राध्यापक सारणी-मध्ये ४१.६५ व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६६.६५ टक्के प्रमाण आहे.

२) विषयाची गोडी वाढविणारा, क्रियाशील, परिसराशी संबंध जोड-णारा, आराखडा, शैक्षणिक साधन, असा मनोरंजक आहे का ? याचे प्रमाण अनुक्रमे ३३.३५ टक्के व १३.३५ टक्के आहे.

३) सर्जनशीलता, कल्पकता, निरीक्षण यांना वाव देणारा याचे प्राध्यापक सारणीमध्ये ८.३५ टक्के प्रमाण आहे.

४) वयोगटाला पेलणारा असावा. याचे प्राध्यापक सारणीत १६.६५ टक्के प्रमाण आहे.

५) तर विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये - चौकस बद्धीला, कृतीला प्राधान्य देणारा याचे १३.३५ टक्के प्रमाण व स्वाध्यायावर चर्चा करत नाहीत. याचे ६.६५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना बहुसंख्य प्राध्यापक घटक, त्याचे दृढीकरण या बाबींवर चर्चा करतात. काही प्राध्यापक गोडी वाढविणे, क्रियाशील, परिसराशी संबंध जोडणे, आराखडा, शैक्षणिक साधन या बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३२ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३० हा विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायातील सुधारणेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२४२ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ४.२४२**

स्वाध्यायातील सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | चर्चा मार्गदर्शन यातून बदल सुचविलो. | ५ | ४१.६६ |
| २) | स्वाध्यायात बदल स्वत: करतो. | २ | १६.६७ |
| ३) | नेमक्या शब्दात, योग्य स्वाध्याय लिहा, अशी सूचना देतो. | ३ | २५.०० |
| ४) | विविध स्वाध्यायांचे स्वरूप समोर ठेवतो. | २ | १६.६७ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | त्रूटी सांगून आणखी कोणकोणत्या पद्धतीने स्वाध्याय देता येतील याची चर्चा/मार्गदर्शन करतात. | ३ + ३ | ४०.०० |
| २) | प्रश्न कसा हवा ते स्वत: सांगतात. | २ + ३ | ३३.३५ |
| ३) | योग्य स्वाध्याय लिहा, अशी सूचना. | १ + ० | ०६.६५ |
| ४) | स्वरूप, प्रकार समोर ठेवतात. | ३ + ० | २०.०० |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा व्हावी अशी अपेक्षा असेल तर ते चर्चा / मार्गदर्शनातून बदल सुचवितात किंवा आणखी कोणकोणत्या पद्धतीने स्वाध्याय देता येतील यावर चर्चा करतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४१.६६ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

२) स्वाध्याय कसा हवा ते स्वत: प्राध्यापक बदल करून सांगतात. याचे अनुक्रमे १६.६७ टक्के व ३३.३५ टक्के प्रमाण आहे.

३) नेमका, योग्य स्वाध्याय लिहा, अशी सूचना देतात. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ६.६५ टक्के प्रमाण आहे.

४) विविध स्वाध्यायाचे प्रकार, स्वतः पुढे ठेवतात. याचे प्रमाण अनुक्रमे १६.६७ टक्के व २०.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा करण्यासाठी चर्चा, मार्गदर्शन यातून बदल सुचवितात. काही प्राध्यापक स्वत: बदल करून देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ३३ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ३१ हा फलक लेखनावरील मार्गदर्शनातील बाबींसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२४३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२४३

फलकलेखनाच्या मार्गदर्शनातील बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | शुद्धलेखन, सुवाच्य अक्षर, आकृत्या त्यांची नावे. | २ | १६.६५ |
| २) | महत्त्वाचे मुद्दे व संकलनात पाठाचा सारांश अर्थपूर्ण, लेखनात मुद्देसूदपणा यावर चर्चा. | ६ | ५०.०० |
| ३) | फलकलेखनाच्या सर्व कौशल्यांच्या पैलूवर चर्चा. | ३ | २५.०० |
| ४) | फलकाचे नियोजन, घटकमुद्दे, आकृत्या दोन भागात इ. | १ | ०८.३५ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | लेखन शुद्ध, अक्षर स्पष्ट व आकारबद्ध, सरळ रेषेत असावे. | ३ + २ | ३३.३३ |
| २) | महत्त्वाचे मुद्दे, उपमुद्दे क्रमाने यावेत, आवश्यक तेथे रंगीत खडू. | ३ + ३ | ४०.०० |
| ३) | फलकाचे दोन भाग करून लेखन करावे. | २ + १ | २०.०० |
| ४) | चर्चा नाही. | १ + ० | ०६.६७ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक फलक-लेखन-संदर्भात चर्चा करताना महत्त्वाचे मुद्दे व संकलनात पाठाचा सारांश

फलकावर यावा, अर्थपूर्ण लेखनात, मुद्देसूदपणा यावर चर्चा करतात. आवश्यक तेथे रंगीत खडूंचा वापर, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५०.०० टक्के व ४०.०० टक्के प्रमाण आहे.

२) लेखन शुद्ध, सुवाच्य, स्पष्ट, आकारबद्ध, सरळ रेषेत यावे, आकृत्या त्यांची नावे यावर चर्चा - प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे १६.६५ व ३३.३३ टक्के प्रमाण आहे.

३) फलक लेखनाचे नियोजन फलकाच्या दोन भागात करून घटक मुद्दे, आकृत्या, मुद्दे, उपमुद्दे कसे लिहावेत यावर चर्चा - याचे प्रमाण अनुक्रमे ८.३५ टक्के व २०.०० टक्के आहे.

४) फलक लेखनाच्या कौशल्याच्या सर्व पैलूंवर चर्चा - प्राध्यापक सारणीमध्ये २५.०० टक्के प्रमाण आहे.

५) चर्चा करत नाहीत. याचे विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये ६.६७ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र पाठमार्गदर्शक प्राध्यापक फलकलेखनावरील मार्गदर्शनात महत्वाचे मुद्दे, संकलनातील पाठाचा सारांश, मुद्देसूदपणातून अर्थपूर्णता या बाबींवर चर्चा करतात. काही प्राध्यापक फलक लेखन शुद्ध, सुवाच्य, आकृत्या व नावे या बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३५ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३२ हा विद्यार्थी-शिक्षकाने केलेल्या फलक लेखन नियोजनातील

सुधारणेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२४४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२४४

फलक लेखनातील सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | महत्त्वाच्या मुद्दयांचा समावेश आकृती शुद्ध लेखन. | ६ | ५०.०० |
| २) | अवांतर माहिती नको. | १ | ०८.३५ |
| ३) | मुद्दयांचे, आकृतीचे नियोजन करा. अक्षरावर रेषा द्या. | २ | १६.६५ |
| ४) | मुख्य मुद्दे, उपमुद्दे, आकृत्या फलकाच्या दोन भागात लिहा. | ३ | २५.०० |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | आकृती प्रमाणबद्ध, ठळक काढा, नावे द्या, नावे द्या, रंगीत खडू वापरा. | १ + २ | २०.०० |
| २) | फलक लेखनात मुद्दे लिहा, थोडक्यात करा, मुद्दे वाढवा, शुद्ध लेखन, आकृती इ. | ४ + २ | ४०.०० |
| ३) | फलक लेखन शुद्ध, सरळ रेषेत, योग्य अंतर ठेऊन मुद्दे लिहा. | २ + २ | २६.६५ |
| ४) | घटकाच्या नावाखाली रेषा, नंतर फलकाचे दोन करा. रंगीत खडूचा अति वापर नको. | २ + ० | १३.३५ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाच्या फलक लेखन नियोजनात ज्या सूचना सुचवितात त्यामध्ये - फलक लेखनात महत्त्वाच्या मुद्दयांचा समावेश करा, मुद्दे लिहा, ते थोडक्यात करा, मुद्दे वाढवा, आकृती काढा, लेखन शुद्ध करा याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ५०.०० टक्के व ४०.०० टक्के आहे.

२) मुख्य मुद्दे व उपमुद्दे, आकृत्या यासाठी फलकाचे दोन भाग करा. घटकाखाली रेष मारा नंतर फलकाचे दोन भाग करा. रंगीत खडूचा अति वापर नको इ. चे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व १३.३५ टक्के आहे.

३) मुद्दयांचे नियोजन करा, अक्षरावर रेषा द्या, योग्य अंतर ठेवा, आकृती प्रमाणबद्ध, ठळक काढा, नावे द्या, रंगीत खडू वापरा. याचे प्रमाण अनुक्रमे १६.६५ टक्के व २०.०० टक्के आहे.

४) अवांतर माहिती नको. प्राध्यापक सारणीमध्ये ८.३५ टक्के प्रमाण आहे.

५) फलक लेखन शुद्ध, सरळ रेषेत, योग्य अंतर ठेऊन मुद्दे लिहा. विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २६.६५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्राच्या पाठमार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखनातील त्रुटीनुसार - महत्त्वाच्या मुद्दयांचा समावेश, मुद्दयांचे लेखन कमी वा अधिक करणे, आकृती काढणे, लेखन शुद्धता याविषयी सुधारणा सुचवितात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ३५ हा विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली-मधील प्रश्न क्र. ३३ हा पाठ उद्या असता विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास येतो यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२४५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२४५

पाठ उद्या असता मार्गदर्शन घेण्यासंबंधी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पाठमार्गदर्शन दोन दिवस आधी घ्या. ते घाईगर्दीत नको, पाठ रद्द करतो. | ६ | ५०.०० |
| २) | रागावतो पण मार्गदर्शन देतो. | ३ | २५.०० |
| ३) | कडक शब्दात समज देऊन टाचण दोन वेळा लिहायला सांगतो. | ३ | २५.०० |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | मार्गदर्शन देत नाहीत, दोन दिवस आधी यावे | ५ + २ | ४६.६५ |
| २) | मार्गदर्शन करतात पण खूप रागवतात. पुन्हा असे होऊ नये. | ३ + २ | ३३.३५ |
| ३) | प्रतिक्रिया नाही, मार्गदर्शन देतात. | १ + २ | २०.०० |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक पाठ उद्या आहे आणि विद्यार्थी-शिक्षक पाठ मार्गदर्शनास आला तर पाठ

मार्गदर्शन दोन दिवस आधी घ्या. ते घाई-गर्दीत नको इ. बोलून पाठ रद्द करतात. याचे प्रमाण अनुक्रमे ५०.०० टक्के व ४६.६५ टक्के आहे.

२) मार्गदर्शन करतात पण खूप रागावतात. पुन्हा असे होऊ नये अशी समज देतात. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ३३.३५ टक्के आहे.

३) कडक शब्दात समज देऊन टाचण दोन वेळा लिहायला सांगतो. याचे प्राध्यापक सारणीमध्ये २५.०० टक्के प्रमाण आहे.

४) प्रतिक्रिया नाही, मार्गदर्शन देतात - विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक पाठ उद्या आहे व विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास आला तर मार्गदर्शन न करता ते दोन दिवस आधी घ्यावे असे सांगून पाठ रद्द करतात. काही प्राध्यापक मात्र कडक शब्दात समज देऊन मार्गदर्शन करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ३६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३४ हा प्राध्यापक मार्गदर्शनात ज्या मुद्दयांना अधिक वेळ देतात त्यांच्या क्रमाविषयीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र. ४.२४६ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र. ४.२४६

मार्गदर्शनात प्राध्यापक अधिक वेळ देतात त्यानुसार घटक क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १०६ | १. | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १२४ |
| २. | शिक्षक-विद्यार्थी कृती | ८९ | २. | शिक्षक-विद्यार्थी कृती | ११३ |
| ३. | पाठ्य मुद्दे | ८१ | ३. | पाठ्य मुद्दे | १०८ |
| ४. | प्रेरणा | ७५ | ४. | प्रेरणा | ९२ |
| ५. | पूर्वज्ञान | ६२ | ५. | शैक्षणिक साधने | ८८ |
| ६. | मूल्यमापन साधने | ५६ | ६. | पूर्वज्ञान | ८४ |
| ७. | शैक्षणिक साधने | ५१ | ७. | संकलन | ६२ |
| ८. | संकलन | ५० | ८. | उपयोजन | ५५ |
| ९. | उपयोजन | ४८ | ९. | मूल्यमापन साधने | ५३ |
| १०. | फलक लेखन | ४० | १०. | फलक लेखन | ५२ |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरील सारणीमध्ये १ ते ४ क्रम समान आहेत. पुढे भिन्न क्रम येतो म्हणून वरील सारणीमध्ये मार्गदर्शक प्राध्यापक ज्या घटकाला अधिक वेळ देतात त्यानुसार घटकाना प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले क्रम एकत्रित केले असता पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्राच्या पाठमार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक ज्या घटकाला अधिक वेळ देतात त्यानुसार घटक क्रम पुढील प्रमाणे - १) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, २) शिक्षक-विद्यार्थी कृती, ३) पाठ्यमुद्दे, ४) प्रेरणा, ५) पूर्वज्ञान, ६) शैक्षणिक साधने, ७) मूल्यमापन साधने, ८) संकलन, ९) उपयोजन, १०) फलक लेखन.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३७ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३५ हा मार्गदर्शनातील दुर्लक्षित घटकासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२४७ मध्ये दिलेली आहे.

### सारणी क्र. ४.२४७

### मार्गदर्शनातील दुर्लक्षित घटक

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | कोणताही नाही | ९ | ७५.०० |
| २) | संकलन | २ | १६.६५ |
| ३) | पूर्वज्ञान | १ | ०८.३५ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | **विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद** | | |
| १) | कोणताही नाही. | ३ + ३ | ४०.०० |
| २) | संकलन, फलक लेखन, उपयोजन. | ३ + ३ | ४०.०० |
| ३) | प्रेरणा, मूल्यमापन साधने, शैक्षणिक साधने. | 2 ~~३~~ + ० | १३.३५ |
| ४) | पूर्वज्ञान, पाठ्यमुद्दे. | १ + ० | ०६.६५ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक ज्या मार्गदर्शन घटकाकडे दुर्लक्ष करतात असा कोणताही घटक नाही. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ७५.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

२) संकलन प्राध्यापक सारणीत १६.६५ टक्के प्रमाण, तर संकलन, उपयोजन, फलक लेखन याचे विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

३) पूर्वज्ञान याचे प्राध्यापक सारणीत ८.३५ टक्के प्रमाण, तर पूर्वज्ञान व पाठ्य मुद्दे याचे विद्यार्थी सारणीमध्ये ६.६५ टक्के प्रमाण आहे. हे अत्यल्प आहे.

४) प्रेरणा, मूल्यमापन साधने व शैक्षणिक साधने याचे विद्यार्थी सारणीमध्ये १३.३५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र पाठ मार्गदर्शक प्राध्यापक वरील मार्गदर्शन घटकातील सर्व घटकांकडे लक्ष देतात. काही प्राध्यापक संकलन, उपयोजन, फलक लेखन या घटकांकडे दुर्लक्ष करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३८ हा विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३६ हा मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा सहभाग घेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२४८ मध्ये दिलेली आहे.

## सारणी क्र. ४.२४८

### मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ७ | ५ | - | - | १२ |
| | ५८.३५ | ४१.६५ | | | १०० |
| विद्यार्थी शिक्षक : | | | | | |
| | ६ | ३ | - | - | ९ |
| | २ | ३ | १ | - | ६ |
| एकूण .. | ५३.३५ | ४०.०० | ६.६५ | - | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५८.३५ टक्के व ५३.३५ टक्के प्रमाण आहे.

२) मध्यम सहभाग घेतात. याचे प्रमाण अनुक्रमे ४१.६५ टक्के व ४०.०० टक्के प्रमाण आहे.

३) अल्प सहभाग घेतात. याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६.६५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

बहुसंख्य प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात. तसेच खूपच प्राध्यापक मध्यम स्वरूपाचा सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३७ हा एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांच्या सहभागासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२४९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२४९

एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १ | ३ | ७ | १ | १२ |
| | ८.३३ | २५.०० | ५८.३४ | ८.३३ | १०० |
| विद्यार्थी शिक्षक : | | | | | |
| | - | २ | ५ | २ | ९ |
| | - | १ | ५ | - | ६ |
| एकूण .. | - | २०.०० | ६६.६५ | १३.३५ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक एका मार्गदर्शनाच्यावेळी उपस्थित असलेल्या अन्य विद्यार्थी-शिक्षकाचा अल्प सहभाग घेतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५८.३४ टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६६.६५ टक्के प्रमाण आहे.

२) मध्यम सहभाग घेतात. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व २०.०० टक्के आहे.

३) अजिबात सहभाग घेत नाहीत. याचे प्रमाण अनुक्रमे ८.३३ टक्के व १३.३५ टक्के प्रमाण आहे.

४) खूपच सहभाग घेतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ८.३३ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक एका पाठमार्गदर्शनाच्यावेळी उपस्थित असलेल्या अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा अल्प सहभाग घेतात. तर काही प्राध्यापक मध्यम स्वरूपाचा सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ४० व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ३८ हा पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास त्यातच सुधारणा की पूर्ण बदल करतात या संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२५० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२५०

पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास

| | सुधारणा | पूर्ण बदल | फक्त वर्षारंभी पूर्ण | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | १ | १ | १२ |
| | ८३.३३ | ८.३३ | ८.३३ | १०० |
| विद्यार्थी शिक्षक : | | | | |
| | ४ | ५ | - | ९ |
| | ४ | - | २ | ६ |
| एकूण .. | ५३.३३ | ३३.३३ | १३.३३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचे नियोजन चुकीचे असल्यास आहे त्यात बदल । सुधारणा करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ८३.३३ टक्के व ५३.३३ टक्के आहे.

२) पूर्णपणे बदल करतात. याचे प्रमाण अनुक्रमे ८.३३ टक्के व ३३.३३ टक्के आहे.

३) वर्षारंभी फक्त पूर्ण बदलतो. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ८.३३ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचे पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास आहे त्या पाठ टाचणात सुधारणा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ४१ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली-मधील प्रश्न क्र. ४० हा मार्गदर्शनाच्या काळात विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२५१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२५१

विद्यार्थी-शिक्षकाने मार्गदर्शनात चुकीची उत्तरे दिल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | अधिक वाचन, अभ्यास हवा, तयारी करा व नंतर मार्गदर्शन घ्या. | ४ | ३३.३५ |
| २) | थोडीशी हिंट देतो. दुरुस्ती करुन घेतो. | ६ | ५०.०० |
| ३) | तीव्र प्रतिक्रिया असते. | २ | १६.६५ |
| | एकूण .. | १२ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | अधिक तयारी हवी, अभ्यास करुन मग या. | २ + ० | १३.३३ |
| २) | प्रश्न विचारुन त्या मुद्दयाचे बरोबर उत्तर काढून घेतात. | ५ + २ | ४६.६७ |
| ३) | त्यातील चूक निदर्शनास आणून स्वत: स्पष्टीकरण करतात. | २ + ३ | ३३.३३ |
| ४) | प्रतिक्रिया नाही. | ० + १ | ०६.६७ |
| | एकूण .. | ९ + ६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाशी चर्चा करताना त्यानी चुकीची उत्तरे दिली तर - थोडीशी हिंट देतात, प्रश्न विचारुन त्या मुद्दयाचे उत्तर काढून घेतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५०.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ४६.६ टक्के प्रमाण आहे.

२) अधिक वाचन, अभ्यास हवा. तयारी करा व नंतर मार्गदर्शन घ्या याचे प्रमाण अनुक्रमे ३३.३५ व १३.३३ टक्के आहे.

३) त्यातील चूक निदर्शनास आणून स्वत: प्राध्यापक स्पष्टीकरण करतात. याचे प्रमाण विद्यार्थीशिक्षक सारणीमध्ये ३३.३३ टक्के आहे.

४) तीव्र प्रतिक्रिया असते - दुरुस्ती करा. सूचना देतो. याचे प्राध्यापक सारणीमध्ये १६.६५ टक्के प्रमाण आहे.

५) प्रतिक्रिया नाही याचे विद्यार्थी सारणीमध्ये ६.६७ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

शास्त्र पाठमार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यास प्रश्न विचारुन त्या मुद्दयाचे उत्तर काढून घेतात. मात्र काही प्राध्यापक अधिक वाचन, अभ्यास करुन तयारी करा व मग मार्गदर्शन घेण्यास सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ४२ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली-मधील प्रश्न क्र. ३९ हा अधिक वाचन, अभ्यास व शैक्षणिक साधन यांच्या

आग्रहासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२५२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२५२

अधिक वाचन, अभ्यास व शैक्षणिक साधन यांचा आग्रह

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२ | - | १२ |
| | १००.०० | | १००.०० |
| विद्यार्थी शिक्षक : | | | |
| | ८ | १ | ९ |
| | ६ | - | ६ |
| एकूण .. | ९३.३३ | ६.६६ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन, अभ्यास, शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १००.०० टक्के व ९३.३३ टक्के प्रमाण आहे.

२) आग्रह धरत नाहीत. याचे विद्यार्थी सारणीमध्ये ६.६७ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

वरील निरीक्षणावरून असा निष्कर्ष निघतो की शास्त्रअध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन, अभ्यास, शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४३ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४१ हा मराठी अध्यापनपद्धतीचे मार्गदर्शन व अन्य विषयांच्या अध्यापनपद्धतीचे मार्गदर्शन यातील फरकासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.२५३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.२५३

मराठी पाठमार्गदर्शन व अन्य विषयांच्या पाठमार्गदर्शनातील फरक

| | फरक आहे | नाही | उत्तरे नसणारे | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ११ | - | १ | १२ |
| | ९१.६७ | | ८.३३ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक : | | | | |
| | ६ | - | ३ | ९ |
| | ५ | - | १ | ६ |
| एकूण .. | ७३.३३ | - | २६.६७ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी पाठमार्गदर्शन व अन्य विषयांच्या पाठमार्गदर्शनात फरक आहे. याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ९१.६७ टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ७३.३३ टक्के आहे.

२) फरक नाही, शून्य प्रमाण व

३) उत्तरे नसणारे ८.३३ टक्के प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक २६.६७ टक्के इतके आहेत.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> :

मराठी पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांचे पाठमार्गदर्शन यात फरक आहे.

वरील निष्कर्षानुसार कोणते फरक आहेत ते पुढील पान क्र. ५४० ते ५६३ वर सर्व विषयांच्या प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांच्या मतांचा गोषवारा दिलेला आहे.